महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.१५५/२०२२/जाहिरात दिनांक: २८ नोव्हेंबर, २०२२

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : संजीवन शास्त्रज्ञ (Perfusionist), सामान्य राज्य सेवा, गट-ब - अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०९६/२०२२**

शासनाच्या, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संजीवन शास्त्रज्ञ (Perfusionist), सामान्य राज्य सेवा, गट-ब या संवर्गातील एकूण ०४ पदांच्या भरतीकरीता दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी (जाहिरात क्रमांक ०९६/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती.

**२.** प्रस्तुत संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार जाहिरातीमध्ये शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आलेली आहे. तथापि, शासन पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक संआसे २०२१/प्र.क्र.२५७/सेवा-१, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ अन्वये B.Sc. in Paramedical Tech.-Perfusion ही शैक्षणिक अर्हता विषयांकित संवर्गाकरीता ग्राह्य समजण्यात येईल, असे आयोगास कळविण्यात आले आहे. यास्तव, प्रस्तुत शासन पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार संबंधित अर्हताधारक पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक ०४ डिसेंबर, २०२२ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०५ डिसेंबर, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**३.** शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि जाहिरातीस अनुसरुन सादर करावयाच्या आवश्यक प्रमाणपत्रांची वैधता तपासण्याकरीता अंतिम दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ असा राहील. तसेच इतर सर्व अटी व तरतुदी, प्रसिध्द करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ०९६/२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

**४.** सदर शुध्दीपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ०९६/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.